**प्रसिध्दी पत्रक** दिनांक : २६/०८/२०२३

**· सेवानिवृत्त मंडळ कृषी अधिकारी श्री दत्तात्रय गिरी यांची ४८,४३,०६५/– रूपये किंमतीची बेहिशोबी मालमत्ता (६९.५७ %) निष्पन्न झाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे अपसंपदेचा गुन्हा दाखल**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | पो.स्टे. भाग्यनगर जि. नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.नं. ३३८/२०२३ कलम १३(१)(ई) सह १३ (२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ आणि कलम १०९ भारतीय दंड संहिता |
| तक्रारदार यांचे नाव | श्री. अरविंदकुमार भिमराव हिंगोले, पोलीस निरीक्षक लाप्रवि नांदेड. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १. श्री दत्तात्रय पितांबर गिरी, वय ५९ वर्षे, सध्या सेवानिवृत्त मंडळ कृषी अधिकारी, तत्कालीन कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी कार्यालय, लासुर स्टेशन, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद, वर्ग – ३<br>२. सौ. छायाबाई भ्र. दत्तात्रय गिरी, वय ५५ वर्षे, व्यवसाय गृहीणी.<br>३. श्री शशांक पि. दत्तात्रय गिरी, वय ३२ वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी, सर्व रा. घर क्र. २८, गट क्रमांक ८२, लक्ष्मी विहार, देवळाई परिसर, बीड बायपास, औरंगाबाद. |
| निरीक्षण कालावधी | दिनांक ०१.०१.२०१० ते दिनांक ३१.०५.२०१७ |
| अपसंपदा रक्कम | ४८,४३,०६५/– रुपये किंमतीची बेहिशोबी मालमत्ता (कायदेशिर उत्पन्नाचे तुलनेत ६९.५७ %) |
| थोडक्यात माहिती | यातील लोकसेवक श्री दत्तात्रय गिरी, सेवानिवृत्त मंडळ कृषी अधिकारी यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडून उघड चौकशी करण्यात आली होती. लोकसेवक यांनी संपादित केलेली मालमत्ता कायदेशीर स्त्रोताद्वारे संपादित केली किंवा कसे याबाबत त्यांना वेळोवेळी संधी देवून माहिती मागविण्यात आली होती. परंतु त्यांनी संपादित केलेल्या बेकायदेशीर मालमत्तेबाबत पुष्ठीदायक पुरावे सादर करू शकले नाहीत. त्यांनी लोकसेवक पद धारण केलेल्या कालावधीत त्यांना प्राप्त असलेल्या कायदेशीर उत्पन्नापेक्षा जास्त किंमतीची मालमत्ता स्वत:चे नावे, पत्नी छायाबाई व मुलगा शशांक यांच्या नावे संपादित केल्याचे उघड चौकशी अंती निष्पन्न झाले. त्यांनी संपादित केलेली रू. ४८,४३,०६५/– किंमतीची बेहिशोबी मालमत्ता ही त्यांच्या कायदेशीर उत्पन्नाच्या तुलनेत ६९.५७ % जास्त असल्याचे निष्पन्न झाले आहे.<br>सदरहू विसंगत बेहिशोबी मालमत्ता संपादित करण्यासाठी लोकसेवक श्री दत्तात्रय गिरी यांना त्यांची पत्नी सौ. छाया गिरी व मुलगा शशांक गिरी यांनी मदत करून गुन्हयात प्रोत्साहित करून अपप्रेरणा दिली आहे. म्हणून त्या सर्वांचे विरूध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले असुन पुढील कायदेशीर कार्यवाही चालु आहे. |
| मार्गदर्शक | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. राजेंद्र पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री. संदीप थडवे पोलीस निरीक्षक लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फ्री कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| **FACEBOOK – Dysp Acb Nanded** | **TWITTER - @ACBnanded** |
| **INSTAGRAM – acb_nanded** | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner